नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २०९<br>Issue - 209 | वार शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५<br>Blow- Friday Date 19 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# लोकसभेत 'व्हीबी जी राम जी' विधेयक मंजूर

## लोकसभेत प्रचंड गदारोळ; विरोधकांनी कागदपत्रे भिरकावली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'व्हीबी जी राम जी' विकासित भारत रोजगार आणि उपजीविका हमी विधेयक (ग्रामीण) विधेयक लोकसभेत गोंधळात मंजूर करण्यात आले. चर्चेदरम्यान, विरोधकांनी विधेयकाविरुद्ध घोषणाबाजी केली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी वेलमध्ये कागदपत्रे भिरकावली. गदारोळात हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, मनरेगा मूळतः महात्मा गांधींच्या नावावर नव्हता. ते म ूळतः नरेगा होते. नंतर, २००९ च्या निवडणुका आल्या तेव्हा निवडणुका आणि मतांसाठी महात्मा गांधींची आठवण आली. बापूंची आठवण आली. त्यानंतर त्यात महात्मा गांधींची भर पडली.तत्पूर्वी, विधेयकाच्या निषेधार्थ विरोधकांनी संसद परिसरात मोर्चा काढला. ५० हून अधिक विरोधी खासदारांनी भाग घेतला आणि 'व्हीबी जी राम जी' विधेयक मागे घेण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. बुधवारी, लोकसभेत 'व्हीबी जी राम जी' विधेयकावर १४ तास चर्चा झाली. काम काज १:३५ वाजेपर्यंत चालले. ९८ खासदारांनी भाग घेतला. विरोधकांनी प्रस्तावित कायदा स्थायी समितीकडे पाठवण्याची मागणी केली. तो २० वर्षे जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेईल.

शिवराज म्हणाले, काँग्रेसने कधीही गांधीजींचा आदर केला नाही. आम्ही गांधीजींचा आदर करतो. गांधीजी म्हणाले होते की स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस विसर्जित झाली पाहिजे. ज्या दिवशी काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आला, त्याच दिवशी संविधानाची हत्या करण्यात आली. मोदी सरकारने मनरेगाम धील अनेक त्रुटी दूर केल्या आहेत. मनरेगामध्ये अनेक प्रकारे भ्रष्टाचार झाला आहे. कृषीमंत्री शिवराज सिंह यांनी विचारले की, नेहरू कुटुंबाच्या नावावर किती योजना ठेवण्यात आल्या? ५५ राज्य सरकारच्या योजनांना राजीवजींची नावे देण्यात आली. ७४ रस्त्यांना राजीवजींची नावे देण्यात आली आणि १५ राष्ट्रीय उद्यानांना नेहरूजींची नावे देण्यात आली. काँग्रेसला नामकरणाचा हा ध्यास आहे. काँग्रेस खा-सदार प्रियंका गांधी यांनी १६ डिसेंबर रोजी सांगितले की, त्या या विधेयकाला विरोध करतात. प्रत्येक योजनेचे नाव बदलण्याचा ध्यास अनाकलनीय आहे.

काँग्रेस खासदार केजी वेणुगोपाल यांनी सभापतींना विकास भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्राम ीण) विधेयक 'व्हीबी जी राम जी' स्थायी समिती किंवा संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची विनंती केली. तथापि, सभापतींनी ही विनंती फेटाळून लावत म्हटले की, विधेयकावर १४ तासांहून अधिक काळ चर्चा झाली आहे.

# अजित पवारांनी माणिकराव कोकाटेंचा राजीनामा स्वीकारला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजि पवार यांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारल्याचं जाहीर केलं आहे. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारावा, असं पत्र अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवला आहे. अजित पवार यांनी एक सोशल मीडिया पोस्ट केली आहे. त्या पोस्टद्वारे अजित पवार यांनी राजीनामा स्वीकारल्याची माहिती दिली. आता देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा स्वीकारल्यानंतर माणिकराव कोकाटे यांचं मंत्रिपद अधिकृतपणे जाईल. माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा म ाझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून ते कोणत्याही




व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे, असं अजित पवार म्हणाले. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे. सार्वजनिक जीवन हे नेहमीच संविधानिक नैतिकता, संस्थात्मक प्रामाणिकता आणि न्यायपालिकेच्या सन्माना-वर आधारित असावं, या मूल्यांवर आमच्या पक्षाची निरंतर वाटचाल राहिली आहे. कायदेशीर प्रक्रियेवर आमचा ठाम विश्वास आहे. राज्यात कायदा-व्यवस्थेचं काटेकोरपणे पालन होईल, याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. लोकशाही मूल्ये जपली जातील व जनतेच्या विश्वासाला तडा जाणार नाही, त्या दृष्टीकोनातून आम्ही सदैव कार्यतत्पर राहू, असं अजित पवार म्हणाले. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्यपाल आचार्य देवव्रत यांना पत्र पाठवून माणिकराव कोकाटे यांच्याकडील खाती अजित पवार यांच्याकडे देण्यास सांगितलं होतं.त्या पत्राला आचार्य देवव्रत यांनी मंजुरी दिली होती. त्यामुळं कालपासून माणिकराव कोकाटे हे बिनखात्याचे मंत्री होते. नाशिक शहरातील उच्चभ्रू परिसरात माणिकराव कोकाटे यांनी ३० वर्षांपूर्वी कमी उत्पन्न दाखवत अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवली होती. स्वत:सह भाऊ विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चार जणांनी कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्ह्यू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका प्राप्त केल्या होत्या.

# ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रसिद्ध ज्येष्ठ शिल्पकार पद्मभूषण, महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या निधनाने भारतीय कला विश्वाने एक दिग्गज कलाकार गमावला आहे, अशा शब्दांत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



राम सुतार यांनी आपल्या दीर्घ आणि समर्पित कलासाधनेतून भारतीय शिल्पकलेला जागतिक ओळख मिळवून दिली. त्यांच्या शिल्पांमधून भारतीय इतिहास, संस्कृती आणि महान व्यक्तिमत्त्वे सजीव स्वरूपात साकारली गेली. सरदार वल्लभभाई पटेल यांचे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी', तसेच देशभरातील अनेक महत्त्वपूर्ण स्म ारके ही त्यांच्या अद्वितीय प्रतिभेची साक्ष देतात.

राम सुतार यांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल पद्मश्री, पद्मभूषण यांसारखे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. नुकताच त्यांना राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान असलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होता, ही बाब राज्य आणि कला क्षेत्रासाठी अत्यंत गौरवास्पद असल्याचे राज्यपालांनी नमूद केले.

राम सुतार यांचे निधन ही कला क्षेत्रासाठी मोठी हानी असून, त्यांच्या कलाकृतींमधून त्यांचे कार्य आणि स्मृती सदैव जिवंत राहतील, असे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी म्हटले आहे.

या दुःखद प्रसंगी राज्यपालांनी राम सुतार यांचे कुटुंबिय आणि चाहत्यांप्रती मनःपूर्वक सहवेदना व्यक्त केल्या असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, अशी प्रार्थना केली आहे.

तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्र भूषण डॉ. राम सुतार यांना मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली

शिल्पकला क्षेत्रावर आपले आणि महाराष्ट्राचे नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र (पान २ वर...)

# अखेर काँग्रेसला हात दाखवत माजी आमदार दिलीपराव माने यांचा भाजपमध्ये मुंबई येथे पक्ष प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी




राज्यातील राजकारण खळबळ होणारे महत्त्वाचे घडामोडी आज भेटल्यास व काँग्रेसचे माजी आमदार दिलीपराव माने अधिकृतपणे जनता पक्षात प्रवेश केला. मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयात पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात हा पक्षप्रवेश झाला. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, व ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे, त्यांचे प्रमुख उपस्थित होते हे राज्यातील अनुभवी अभ्यास म्हणून जनतेची थेट ना जोडलेली नेतृत्व म्हणून ओळखले जातात काँग्रेस पक्षात धर्म कार्यरत राहून त्यांनी आमदार म्हणून मतदार संघातील विकास कामे व सामाजिक प्रश्न शेतकरी सर्वसामान्य समस्या विधानसभेत ठामपणे मांडल्या, ग्राम ीण विकास शिक्षण पायाभूत सुविधा आणि शेतकरी ही त्यांच्या कार्याची केंद्रबिंदू राहिले आहे.

पक्षप्रवेशानंतर बोलताना दिली-पराव माने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देशभर सुरू असले-ले विकास कार्य तसेच महाराष्ट्रात भाजप सरकारच्या लोक कल्याणकारी योजना त्यामुळे मी प्रभावित झाला आहे व राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी असतात भाजप सोबत काम करण्याचा निर्णय घेतला आहे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलीपराव माने यांचे भाजपमध्ये स्वागत करताना सांगितलेली दिलीपराव माने यांचा अनुभव जनसंपर्क आणि सामाजिक बांधिलकी भाजपसाठी अनिश्चितच उपयुक्त ठरेल. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे पक्ष संघटक अधिक बळकट होऊल.


चंद्रशेखर बावनकुळे यांनी माने यांचे स्वागत करत आहे संघटनात्मक बांधणीसह जनतेच्या प्रश्नावर एकत्रपणे प्रभावी काम केले जाईल, असा विश्वासही व्यक्त केला. दिलीपराव माने यांच्या बाह्य प्रवेशामुळे संबंधित मतदार संघात राज्याच्या राजकारणात नवे सैनिकांना चर्चा सुरू झाली असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# राज्यात तापमानात घट; विदर्भील सर्वच जिल्ह्यात किमान तापमान १२ अंशाखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात हळूहळू तापमानाचा पारा घसरत आहे. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमधील किमान तापमान १२ अंशाखाली गेलं आहे. त्यामुळं हुडहुडी वाढली आहे. यवतमाळ जिल्ह्यात आज ९.६ अंश तापम ानाची नोंद झाली.तर अकोला, नागपूर १० अंशांवर होते.

राज्यातील अनेक भागात सध्या थंडी वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रात आठवडाभर



कोरडं वातावरण राहणार आहे.

देशासह राज्याततील अनेक भागात तापमानाचा पारा घसरला आहे. राज्यातील अनेक भागात सध्या थंडी वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रात आठवडाभर कोरडं वातावरण राहण-ार आहे. पुढील २ दिवसांत राज्यात कम ाल व किमान तापम ानात किंचित वाढ होणार असून त्यानंतर २ ते ३ अंशांनी तापमान घसरणार आहे.

मराठवाड्यातही बहुतांश ठिकाणी थंडीचा कहर वाढलाय. नांदेडमध्ये आज ८.९ अंश तापमानाची नोंद झाली. तर छत्रपती संभाजीनगर ११ अंशांवर होते. परभणीत पार १०.८ अंशांवर गेलाय.

मध्य महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात जेऊरमध्ये ७ अंश सेल्सियस तापमान होतं. नगर ८.५ अंशांवर गेल्याने नागरिकांना हुडहुडी भरलीय. नाशिक ९.८ अंश तर पुणे १०.४ अंशांवर आहे. सातारा, सोलापूर जिल्ह्यात ११ ते १३ अंश तापमान आहे.

## धनुष्यबाण, कमळ दोन्ही एकच आहेत, कोणत्याही कारणाने युती तुटणार नाही

**अमित साटम**

# मुंबईत भाजप शिवसेनेत १५० जागांवर एकमत, उर्वरित जागांवर निर्णय शिंदे-फडणवीस घेणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या २२७ वार्डांपैकी १५० जागांवरती म हायुतीचे एकमत झालं आहे. उर्वरित ७७ जागांची चर्चा सुरू आहे, आणि ही चर्चा लवकरच पुढच्या दोन-तीन दिवसांमध्ये पूर्ण होईल, अशी माहिती मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी दिली. आज अमित साटम आणि उदय सामंत यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत माहिती दिली. अमित साटम म्हणाले की, उर्वरित जागांवर अंतिम निर्णय राज्याचे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस एकमत करतील. जागावाटपाचा फॉर्म्युला हा आहे की मुंबई म हानगरपालिकेला भ्रष्टाचार विरहित प्रशासन द्यायचे आहे. मुंबईकरांची इच्छा पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि रिपाई महायुती कटिबद्ध आहे.

त्यांनी सांगितले की, कोण किती जागा लढणार हे महत्त्वाचं नाही, महायुती २२७ जागा लढेल आणि १५० पेक्षा जास्त जागा जिंकून म हायुतीचा महापौर विराजमान होईल. २५ वर्षे मुंबईच्या महानगरपालिकेम ध्ये बसून ज्या लोकांनी भ्रष्टाचार केला, मुंबई विकून खाल्ली, आणि आता मतांच्या लांगुलचालनाकरता मुंबई शहराचा रंग बदलण्याचा प्रयत्न करत आहेत, तो प्रयत्न हाणून पाडणे हे महत्त्वाचे आहे. भाजप, शिवसेना आणि रिपाई महायुती इतकी घट्ट आहे की, धनुष्यबाण कमळ हे दोन्ही एकच आहे. शेवटी महत्त्वाचे आहे की, महाराष्ट्राच्या जनतेसाठी आणि मुंबईकरांसाठी काम करणं. ते म्हणाले की, नवाब मलिक यांच्या नेतृत्वातल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीबरोबर आमचं काही देणंघेणं नाही. त्यांच्यावर गंभीर आरोप असल्यामुळे, जोपर्यंत ते निर्दोष मुक्त होत नाहीत, तोपर्यंत आम्ही त्यांच्याबरोबर कोणतेही संबंध ठेवणार नाही.

उदय सामंत म्हणाले की, १५० ठिकाणी आमचं एकमत झालं आहे. ७७ जागांवर चर्चा होईल. जागा किती कोण लढत याच्यापेक्षा आम्ही म हायुतीने पुढे जात आहोत. शिवसेना, भाजप, आरपीआय ही महायुती अतिशय चांगल्या पद्धतीने असली पाहिजे, ही सगळ्यांची भूमिका आहे. अमित शाहांनी सांगितल्याप्रम ाणे, आम्ही १५० जागांपेक्षा जास्त जागा १०० टक्के जिंकणार आहोत. उर्वरित ७७ जागांपैकी काही जागांवर मतभेद राहिल्यास त्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे घेतील. ते म्हणाले की, युती कुठल्याही विषयावरन तुटणार नाही, जागा वाटप सोडा इतर कुठल्याही विषयावरन युती तुटणार नाही. कारण मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करणे हे आम चे कर्तव्य असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय....

### लोकसभेत गदारोळ

'व्हीबी जी राम जी' विकासित भारत रोजगार आणि उपजीविका हमी विधेयक (ग्रामीण) विधेयक लोकसभेत गोंधळात मंजूर करण्यात आले. चर्चेदरम्यान, विरोधकांनी विधेयकाविरुद्ध घोषणाबाजी केली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी वेलमध्ये कागदपत्रे भिरकावली. गदारोळात हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, मनरेगा मूळतः महात्मा गांधींच्या नावावर नव्हता. ते मूळतः नरेगा होते. नंतर, २००९ च्या निवडणुका आल्या तेव्हा निवडणुका आणि मतांसाठी महात्मा गांधींची आठवण आली. बापूंची आठवण आली. त्यानंतर त्यात महात्मा गांधींची भर पडली. तत्पूर्वी, विधेयकाच्या निषेधार्थ विरोधकांनी संसद परिसरात मोर्चा काढला. ५० हून अधिक विरोधी खासदारांनी भाग घेतला आणि 'व्हीबी जी राम जी' विधेयक मागे घेण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. बुधवारी, लोकसभेत 'व्हीबी जी राम जी' विधेयकावर १४ तास चर्चा झाली. कामकाज १:३५ वाजेपर्यंत चालले. ९८ खासदारांनी भाग घेतला. विरोधकांनी प्रस्तावित कायदा स्थायी समितीकडे पाठवण्याची मागणी केली. तो २० वर्षे जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेईल. शिवराज म्हणाले, काँग्रेसने कधीही गांधीजींचा आदर केला नाही. आम्ही गांधीजींचा आदर करतो. गांधीजी म्हणाले होते की स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस विसर्जित झाली पाहिजे. ज्या दिवशी काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आला, त्याच दिवशी संविधानाची हत्या करण्यात आली. मोदी सरकारने मनरेगामधील अनेक त्रुटी दूर केल्या आहेत. मनरेगामध्ये अनेक प्रकारे भ्रष्टाचार झाला आहे. कृषीमंत्री शिवराज सिंह यांनी विचारले की, नेहरू कुटुंबाच्या नावावर किती योजना ठेवण्यात आल्या? ५५ राज्य सरकारच्या योजनांना राजीवजींची नावे देण्यात आली. ७४ रस्त्यांना राजीवजींची नावे देण्यात आली आणि १५ राष्ट्रीय उद्यानांना नेहरूजींची नावे देण्यात आली. काँग्रेसला नामकरणाचा हा ध्यास आहे.

## मराठवाड्यात शेतकरी साजरी करतात 'वेळा' अमावस्या, काय आहे महत्त्व?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
उमरगा:–ज्ञानेश्वर गुरव

वेळा अमावस्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी खास सण आहे. शेतकऱ्यांसाठी वेळा अमावस्येचं काय आहे महत्त्व?

मराठवाड्यातील काही भागात दरवर्षी वेळ अमावस्या मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी शेतात जाऊन पूजा केली जाते. प्रामुख्याने कर्नाटकातील काही तालुके, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, सोलापूर जिल्ह्यातील काही तालुके या भागात वेळ अमावस्या साजरी केली जाते. मुळात कर्नाटक मध्ये 'येळ' म्हणजेच सात. आणि जूनपासून येणारी सातवी अमावस्या म्हणजे 'येळवस'. याचाच अपभ्रंश होऊन 'वेळ अमावस्या'असे नाव पडले असावे.

अमावस्येविषयी समाजामध्ये अनेक समज–गैरसमज आहेत. अमावस्या काही ठिकाणी अशुभ मानली जाते. मात्र, मराठवाड्यात विशेषतः लातूर, धाराशिव, नांदेड आणि बीड या भागतले शेतकरी वेळ अमावस्येचा सण आनंदाने साजरा करतात. मृग नक्षत्रात खरिपाच्या पेरणीनंतर येणारी सातवी अमावस्या ही 'वेळा' म्हणजेच येळी अमावस्या असते. हिरव्या शिवारात आप्तेष्टांना नैसर्गिक भोजनाचा आनंद घेण्यासाठी शेतकरी आमंत्रण देतात. यावर्षी ही हा सण तितक्याच उत्साहात साजरा होत आहे.

होलग्या होलग्या–सालन पलग्या म्हणत आजच्या दिवशी शेतात पूजा केली जाते. दर्श अमावास्येला आपल्या सख्ख्या–सोयर्यांना, मित्रांना आणि अपरिचित पाहुण्यांनाही शेतकरी शेतात जेवायला बोलवतात. शेतात समृद्धी, सुबत्ता लाभावी अशी प्रार्थना घरच्या लक्ष्मीसह शेतकरी कुटुंबिय लक्ष्मी मातेकडे करतात.

काय आहे वेळा अमावस्येचं महत्त्व?

सर्वदात्या काळ्या आईचे आपण काहीतरी देणं लागतो. या पवित्र भावनेने दर्श अमावस्या ही 'वेळ अमावस्या' म्हणून साजरी करण्याची प्रथा आहे. शुभकार्यात अमावस्या या तिथीला निषद्ध मानले जाते. मात्र, अमावस्या ही लक्ष्मीच्या पुजेसाठी महत्वाची असते. दिपावलीमध्येही कुबेर लक्ष्मीचे पुजन अमावस्येदिवशी होते. तिजोरीची पूजा, वहीची पूजा व्यापारी अमावस्येदिवशीच करतात. तर वेळ अमावस्येदिवशी शेतामध्ये कडब्याची कोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा केली जाते. तसेच पिकांचीही पूजा केली जाते. आंब्याच्या झाडाखाली पाच खडे कव व चुण्याने रंगवून पांडवाची पुजा मनोभावे केली जाते. सुगड्यामध्ये आंबिल ठेवलेले असते. ज्वारीच्या रानात चार पाच पाच दहाटाला एकत्रित करून एखादे वस्त्र गुंडाळून फळाफळांवळसह लक्ष्मीची आईची ओटी भरून नैवेद्य दाखविला जातो. धन धान्य लाभू दे आणि शेत शिवार चांगलं फुलू दे अशीच भावना या दिवशी शेतकरी व्यक्त करत असतात.

## भीमाईंची स्मृतिस्थळे प्रकाशमान व्हावी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भीमासारखा ज्ञानसूर्य, प्रकांड पंडित जन्माला घालणाऱ्या भीमाबाई रामजी आंबेडकरांच्या अनेक चिरंतन स्मृती आंबेटेंभे या जन्मगावी आणि साताऱ्याला अखंड तेवत आहेत. आज, २० डिसेंबर भीमाबाईंचा १२९वा स्मृतीदिन त्यानिमित्ताने...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भीमाबाई रामजी सकपाळ (आंबेडकर) यांचे माहेरगाव ठाणे जिल्ह्यातील आंबेटेंभे आणि स्मृतिस्थळ सातारा येथे आहे. ही दोन्ही स्थळे आंबेडकरी इतिहासात अत्यंत पवित्र आणि प्रेरणादायी स्थळे म्हणून गौरविली जातात. दरवर्षी पाच लाखांहून अधिक अनुयायी येथे उपस्थित राहून भीमाबाईंच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन करतात. मात्र भीमासारखा ज्ञानसूर्य जन्माला घालणाऱ्या भीमाबाईंची स्मृतिस्थळे आजही उपेक्षित असून अंधारात चाचपडत आहेत.

ही स्थळे केवळ स्मारके नसून आंबेडकरी चळवळीचे संस्कारकेंद्र आहेत. त्यांच्या कष्टमय आयुष्यानेच भीमरावाला कठोर संघर्षाची, शिक्षणाची आणि मानवी मूल्यांची शाश्वत शिकवण मिळाली.

आंबेटेंभे गाव कल्याण शहरापासून ४९ किलोमीटर अंतरावर असून सह्याद्रीच्या रांगेच्या कडेला वसले आहे. भालू या श्वापदामुळे गावाचे नाव भालूक ठेवण्यात आले.

## सोलापूर महानगरपालिका निवडणूक वंचित बहुजन आघाडी पूर्ण ताकदीनिशी लढणार ; इच्छुक उमेदवारांचे मुलाखती संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर महानगरपालिका साठी आगामी काळात होणाऱ्या निवडणूक च्या संदर्भात आज वंचित बहुजन आघाडी सोलापूरच्या वतीने इच्छुक उमेदवारांचे मुलाखत घेण्यात आले त्याचप्रमाणे जिल्हा परिषद पंचायत समिती च्या निवडणुकीच्या संदर्भात सुद्धा इच्छुक उमेदवारांचे मुलाखत आज दिनांक १४ /१२/ २०२५ रोजी घेण्यात आले



तब्बल ११६ उमेदवारांनी आज मुलाखती दिल्या या मुलाखाती राज्य उपाध्यक्ष सोलापूर जिल्हा निरीक्षक सोमनाथ साळुंखे सर आणि राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉक्टर नितीन ढेपे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पाडला यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे युवक शहराध्यक्ष महेश जाधव शहर महासचिव विनोद इंगळे वंचितचे नेते रवि बॉस गायकवाड आणि शहर व जिल्ह्याचे सर्व कार्यकारणी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सोमनाथ साळुंखे सर यांनी निवडणुकीची सर्व तयारी पूर्ण झाली असून वंचित बहुजन आघाडी सोलापूर महानगरपालिका पूर्ण ताकदीनिशी लढणार आहे सर्व उमेदवारांचे कागदपत्राचे काम चालू असून एकाच वेळेस सगळ्या उमेदवारांचे फॉर्म भरण्याचा विचार आहे सोलापूरच्या विकास करण्यासाठी सोलापूरला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीला एक संधी सोलापूर शहरातील समजदार सुजाण विचारवंत शिव शाहू फुले आंबेडकर व संविधान वादी जनतेने वंचितला एक संधी द्यावी असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांचे निधन

(पान १ वरून..) फडणवीस यांनी पद्मभूषण, महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांचे सांत्वन केले. तसेच, सुतार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात यावेत, यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना दूरध्वनी करून विनंती केली. ती उत्तर प्रदेश सरकारने तत्काळ मान्य केली. त्यानुसार सुतार यांच्या पार्थिवावर नोएडा येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येतील. मुख्यमंत्री शोक संदेशात म्हणतात, रामभाऊंच्या निधनाने जागतिक कीर्तीचा कलाकार आपल्यातून निघून गेला. प्रमाणबद्धता आणि त्यातील जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य होते. काही दिवसांपूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गेलो होतो, पुरस्कार स्वीकारताना त्यांनी 'महाराष्ट्र माझा' या गीताच्या ओळी उच्चारल्या तेव्हा भारावून गेलो होतो. अनेक शिल्पांना त्यांनी आकार दिला. शंभराव्या वर्षी सुद्धा ते इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामात व्यस्त होते. त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे संसद भवन परिसरात उभे आहेत. आपले आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, आपले संत अशा मोठ्या मांदियाळीच्या शिल्पांना आकार देण्याचे काम त्यांनी केले. या शिल्पांच्या माध्यमातून त्यांची कला शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील आणि प्रत्येक शिल्प पाहताना त्यांचेच स्मरण होईल, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## प्रज्ञा सातव यांनी विधानपरिषद आमदारकीचा राजीनामा देऊन केला भाजपात प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/हिंगोली : राहुल गांधी यांचे निकटवर्तीय राहिलेले दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी, काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांनी विधान परिषदेच्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. प्रज्ञा सातव यांनी राजीनाम्यानंतर अवघ्या काही तासातच भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती धरला. त्यामुळे मराठवाड्यात पक्षाचं बळ वाढलं आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र काँग्रेससाठी हा हिंगोलीत मोठा धक्का मानला जातोच, मात्र राहुल गांधी यांच्या निष्ठावान नेत्यांच्या कुटुंबीयांनी 'हात' सोडल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

प्रज्ञा सातव या काँग्रेसच्या तिकिटावर विधान परिषद आमदार होत्या. ऑगस्ट २०२१ पासून त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा म्हणूनही कार्यरत होत्या. नोव्हेंबर २०२१ मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर त्यांची बिनविरोध निवड झाली होती. त्या महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाकडून विधान परिषदेवरील एकमेव महिला सदस्य होत्या.



महाराष्ट्रातील हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार राजीव सातव यांच्या त्या पत्नी आहेत. गांधी कुटुंबाशी सातव कुटुंबाचे जवळचे संबंध होते. १६ मे २०२१ रोजी वयाच्या ४६ व्या वर्षी कोविड–१९ संसर्गातून उद्भवलेल्या गुंतागुंतींमुळे राजीव सातव यांचे निधन झाले.

शरद रणपिसे यांच्या निधनानंतर २३ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेची जागा रिक्त झाली होती. राजीव सातव यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांना संसदीय राजकारणात स्थान मिळावे, या दृष्टीने प्रज्ञा सातव यांचे नाव काँग्रेस पक्षाच्या उमेदवार म्हणून पुढे करण्यात आले.

भाजपकडून संजय केणेकर उमेदवार होते, परंतु त्यांनी निवडणुकीपूर्वी माघार घेतल्याने सातव यांची बिनविरोध निवड झाली. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी भाजपला उमेदवार न देण्याची विनंती केल्यानंतर राजकीय संस्कृतीचं देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून संजय केणेकर यांनी माघार घेतली होती. त्यानंतर २०२४ मध्ये त्यांची फेरनिवड करण्यात आली. त्यामुळे पाच वर्षांची टर्म बाकी असतानाही प्रज्ञा सातव यांनी राजीनामा दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

प्रज्ञा सातव यांनी १८ डिसेंबर रोजी विधानपरिषदेच्या आमदारकीसोबतच काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर मुंबईत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजप प्रवेश केला. 'मी आणि माझे सर्व सहकारी सबका साथ, सबका विश्वास, सबका प्रयास या धोरणाने जोमाने काम करु. मार्गदर्शन कायम राहू द्या' असं प्रज्ञा सातव प्रवेशावेळी म्हणाल्या.

### युनेस्कोतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरणाबद्दल राजदूत विशाल शर्मांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा 'युनेस्को'च्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची बाब : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई :– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा युनेस्कोच्या मुख्यालयात उभारणे ही गौरवाची, ऐतिहासिक आणि जागतिक स्तरावर महत्त्वाची घटना आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवाधिकारांचे जागतिक प्रवक्ते म्हणून त्यांची ओळख आहे. शिक्षण हे यशाकडे नेणारे साधन आहे हा बाबासाहेबांचा संदेश जगभर पोहोचविण्याच्या उदात्त हेतूने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा युनेस्कोला भेटस्वरूपात देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

युनेस्कोला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेटस्वरूपात अर्पण केल्याबद्दल युनेस्को, पॅरिस येथील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेत आभार मानले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची ही भारताच्या ८० वर्षांच्या सदस्यत्वातील पहिलीच घटना असल्याचे शर्मा यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने युनेस्कोमध्ये बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण होणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक बाब असून, या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन केले.

केंद्र शासनाच्या वतीने शर्मा यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने युनेस्कोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला युनेस्कोचे महासंचालक, ५० हून अधिक देशांचे राजदूत तसेच युनेस्को सचिवालयाचे सदस्य उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे संदेश यावेळी वाचून दाखविण्यात आले होते, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमास संबोधित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बाबासाहेबांचा समतेचा संदेश आणि शिक्षणाचे महत्त्व जगभरातील तरूणांपर्यंत पोहोचविण्याचा हा



राज्य व केंद्र शासनाचा प्रयत्न होता. याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराजांचे ११ किल्ले (तामिळनाडूतील एक) असे देशातील १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे ही राज्यासाठी अत्यंत गौरवास्पद बाब असून, हा नामांकन सोहळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी शिवनेरी किल्ल्यावर भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा शासनाचा मानस आहे.

छत्रपतींचा समृद्ध वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा म्हणजेच 'लोककल्याणासाठीच राज्य' या विचाराशी सुशासनाचा संदेश जोडण्याचा प्रयत्न करण्यात यावा. तसेच दीपावलीचा अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून समावेश करताना, दिखाव्यापेक्षा त्यामागील मूल्यांचा विचार करून सुशासनाची संकल्पना पुढे नेण्याची गरज आहे.

किल्ले व वारसा आधारित विकासासाठी ५० हजारापेक्षा जास्त रोजगार तयार होईल आणि एक हजार कोटीच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडे असलेल्या प्रस्तावावर यावेळी चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, राज्य पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गारगे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच सांस्कृतिक व पुरातत्त्व विभागातील अधिकाऱ्यांशीही राजदूत शर्मा यांनी चर्चा केली. चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शर्मा भेट देणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कळंब तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात गैर प्रकारांचे आरोप



## नायब तहसीलदारांवर आर्थिक व मानसिक त्रास दिल्याचा रास्त भाव दुकानदार संघटनेचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे : कळंब तहसील कार्यालयातील पुरवठा विभागामध्ये गंभीर स्वरूपाचे गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप रास्त भाव दुकानदार संघटना, कळंब यांच्या वतीने करण्यात आला आहे. संघटनेने कळंब तहसीलदार मा. हेमंत ढोकले यांच्याकडे लेखी निवेदन दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी दिले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार शिल्पा नागुराव माळवे यांचा मनमानी कारभार, आर्थिक मागणी व मानसिक त्रास दिल्याचे गंभीर आरोप संघटनेच्या निवेदनात केले आहेत. तर निवेदनात असे ही म्हटले आहे की, तालुक्यातील काही ठरावीक गावांतील नवीन शिधापत्रिकांची फोड कोणतीही अधिकृत फाईल प्रक्रिया न करता करण्यात येत असून, अशा कार्डधारकांना तात्काळ धान्यपुरवठा सुरू केला जात आहे. मात्र मागील दीड ते दोन वर्षांपूर्वी नियमाप्रमाणे फोड केलेल्या अनेक कार्डधारकांना आजही धान्यापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

धान्य सुरू करून देण्यासाठी प्रति शिधापत्रिका २,००० रुपयांची बेकायदेशीर मागणी केली जाते, तर शिधापत्रिका फोडण्यासाठी २ ते ३ हजार रुपयांची मागणी संबंधितांकडून करण्यात येत असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. पैसे देणाऱ्यांचीच कामे केली जात असून, ठरावीक गावांतील व ठरावीक राशन दुकानदारांनाच प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप आहे.

काही राशन कार्डांना नियमबाह्य पद्धतीने थेट झक्क(प्राथमिक प्राधान्य कुटुंब) वर्गात समाविष्ट करून तात्काळ धान्य सुरू करण्यात आले असल्याचे पुरावे संघटनेने निवेदना सोबत सादर केल्याचे सांगण्यात येते. याशिवाय प्रत्येक रास्त भाव दुकान तपासणीसाठी दुकानदारांकडून ३,००० रुपयांची रक्कम घेतली जात असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, मागील दोन ते तीन वर्षांपासून शासनाकडुन ऑफलाईन शिधापत्रिका देणे बंद असतानाही नायब तहसीलदार यांच्या स्वतःच्या स्वाक्षरीने शिधापत्रिका दिल्याचे प्रकार समोर आले असून, त्याच्या झेरॉक्स प्रतीही निवेदनासोबत सादर करण्यात आल्या आहेत.

या सर्व प्रकारांमुळे कळंब तालुक्यातील अनेक कार्डधारक व रास्त भाव दुकानदारांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष आत्माराम बोंदर यांचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित नायब तहसीलदार शिल्पा नागुराव माळवे यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून तालुक्यातील सर्व कार्डधारक व दुकानदारांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने केली आहे.

सदरील निवेदनाची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी धाराशिव, तसेच खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास दादा पाटील व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना ही देण्यात आली आहे.या निवेदनावर कळंब चे तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी काय? कार्यवाही करतात या कडे तालुक्यातील नागरीकांचे लक्ष केंद्रित झाले आहे.सदरील निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष आत्माराम बोंदर, उपाध्यक्ष आबासाहेब मुळीक, सचिव किरण बोराडे यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# माणिकराव कोकाटे राजीनाम्यानंतर मंत्रिपदाची जबाबदारी मनोज कायंदे यांच्याकडे सोपवा; विदर्भासाठी राष्ट्रवादीची ठाम मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटा चे आमदार मनोज देवानंद कायंदे यांना रिक्त मंत्रिपद देण्यात यावे, अशी







**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष सिध्दार्थ जाधव यांची अजित पवार यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी**

मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष सिद्धार्थ जाधव यांनी केली आहे.

माणिकराव कोकाटे यांनी नाशिक सत्र न्यायालयाच्या निर्णयामुळे मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर, विदर्भातील नेतृत्व बळकट करण्याची ही संधी असून, मनोज कायदे यांना मंत्रिपद देणे ही काळाची गरज असल्याचे मत सिद्धार्थ जाधव यांनी मांडले.

यासंदर्भात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आणि निवेदन सादर करून ही मागणी पुढे रेटली आहे.

यामागील कारणे पुढीलप्रमाणे : विदर्भाचा विकास साधण्यासाठी मजबूत नेतृत्वाची गरज पश्चिम विदर्भातील शेतकरी व सर्वसामान्यांसाठी लोकाभिमुख निर्णयांना गती पक्षाची पकड आणि जनतेचा विश्वास अधिक मजबूत करण्यासाठी मंत्रिपदाची गरज

कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत, विदर्भाला प्रतिनिधित्व देत मनोज कायंदे यांच्याकडे मंत्रिपद सोपवण्यात यावे – अशी ठाम व आग्रही भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट केली आहे.

# दिल्ली येथे विष्णुदादा भोसले यांसह पुरंदर तालुक्यातील पाच व्यक्तींचा भारत भुषण अवार्ड देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड

रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी सुनील जगताप, आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध पंच मनोहर ताथवडकर, सेवानिवृत्त बँक अधिकारी सुधीर शेलार, व सांप्रदायिक क्षेत्रात काम करणारे नामदेव नेटके यांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले, यांच्या शुभहस्ते, नवी दिल्ली येथील, न्यु महाराष्ट्र सदनात डॉ बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रीय भारत भुषण अवार्ड देऊन गौरविण्यात आले, यावेळी, मुंबई जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश सादीकअली सय्यद, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी डॉ. मनोज गवई व विविध राज्याचे प्रमुख मान्यवर यावेळी उपस्थित होते,

जागतिक मानव अधिकार दिनाच्या निमित्ताने, आंबेडकर ग्लोबल फाऊंडेशन, मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघठन व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने, नवी दिल्ली येथील न्यु महाराष्ट्र सदनात विशेष संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी , विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना वरील संस्थेच्या वतीने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भुषण अवार्ड, मानवरत्न, समाजरत्न, उद्योगरत्न, अवार्ड, देऊन सन्मानित करण्यात आले,





यावेळी गेले अनेक वर्षे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासज आठवले यांच्या नेतृत्वाखाली सोशित वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने काम करणारे, व आंदोलनाच्या माध्यमातून अनेक प्रश्न धसास लावणारे विष्णूदादा भोसले यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांच्या शुभहस्ते, डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय भारत भुषण अवार्ड देऊन गौरविण्यात आले, यावेळी, त्यांच्या सोबत पुरंदर तालुक्यातील, प्रशासकीय सेवेत उज्वल कामगिरी केल्याबद्दल सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी सुनील जगताप, आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध पंच, व अखिल भारतीय कोल्हाटी डोंबारी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस मनोहर ताथवडकर, सेवानिवृत्त बँक अधिकारी, व पुरंदर तालुका रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे कार्याध्यक्ष सुधीर शेलार, पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे माजी तालूका अध्यक्ष व सांप्रदायिक क्षेत्रात काम करणारे नामदेव नेटके, यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय भारत भुषण अवार्ड देऊन गौरविण्यात आले, यावेळी महाराष्ट्रासह विविध राज्यातील मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते,

# ज्याला उमेदवारी मिळेल त्याच्या मागे राहण्याचे आवाहन

**दक्षिणमधील इच्छुकांशी आ. सुभाष देशमुख यांनी साधला संवाद**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर शहर भाजपमध्ये मोठ्या हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असणार्या सर्व इच्छुकांसोबत शहरातील विविध ठिकाणी संवाद साधला.

याप्रसंगी आ. सुभाष देशमुख यांच्यासह मनीष देशमुख, शशी थोरात, डॉ. शिवराज सरतापे, हनुमंत कुलकर्णी, प्रभागातील मंडळ अध्यक्ष व भाजप पदाधिकारी उपस्थित होते. सोलापूर महापालिका निवडणुकीत सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात आठ प्रभागाचा समावेश आहे. गतवेळच्या निवडणुकीत आठ प्रभागातील २२ नगरसेवकापैकी ११ नगरसेवक हे भाजपचे होते. यंदाच्यावेळी या सर्व २२ प्रभागातून २०० पेक्षा जास्त इच्छुक आहेत. त्यांच्याशी संवाद आ. देशमुख यांनी साधला. भाजप हा कार्यकर्त्यांना संधी देणारा पक्ष आहे. महापालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात इच्छुक आहेत. सर्वांना उमेदवारी देणे शक्य नाही. त्यामुळे पक्षाकडून ज्याला उमेदवारी देण्यात येईल, त्या उमेदवारांचा सर्वांनी एकत्रित प्रचार करावा. भविष्यात संधी उपलब्ध होईल, तसा न्याय उर्वरित कार्यकर्त्यांना देण्यात येईल. असे आश्वासन आ. सुभाष देशमुख यांनी दिले.

यावेळी इच्छुकांनी उमेदवारी देताना प्रभागातील स्थानिकांचा विचार व्हावा, आयात उमेदवाराला उमेदवारी देऊ नये, अशी भूमिका मांडली.

# महिला बनवतायत आकर्षक वस्तू; प्रशिक्षणातून महिलांची उद्योगाकडे वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (दि. १८) फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा वूमन अँड जेंडर इम्पॉरमेन्ट या सदराखाली व पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली महिला संघम व प्रेरणा समाजीक संस्था यांच्या सहकार्याने आयोजित महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरातून महिला विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण घेत आहेत.

एफ.पी.ए.आय. मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंन्ट डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू व जेन्डर अँड राइट्स विभागाच्या डायरेक्ट निशा जगदीश यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरातील विविध भागांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.



महिला साक्ष्मीकरण हा उद्देश घेऊन सुरु करण्यात आलेल्या स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून सोलापूर शहराच्या विविध भागातून महिला एकत्र येऊन व्यवसायाचे प्रशिक्षण घेत आहेत. लोकरीचे पडदे, सेंट, अत्तर, उदबत्ती, मेणबत्ती, शोभेच्या वस्तू, कापडी व कागदी पिशव्या, शोभेचे हँगिंग आरसे, आकर्षक बाहुली, कात्याच्या व कापडी आकर्षक पायपुसणी, गोल्डन ट्री, साडीचे गोंडे, कागदी वाट्या व प्लेट आदी वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. सत्तर फूट रोड येथील कार्यक्रम हॉल मध्ये प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले आहे. याठिकाणी ५० महिला प्रशिक्षण घेत असल्याची माहिती सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, डॉ. आयेशा रंगरेज व डॉ. विजया महाजन यांनी दिली.

प्रशिक्षण शिबिरास माधवी अंदे, लक्ष्मी दोरनाल यांचे विशेष सहकार्य लाभात आहे. प्रशिक्षिका लक्ष्मीताई कुर्लेकर या महिलांना प्रशिक्षण देत आहेत तर शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, सोशल वर्कर कल्पना गडगडे, आकाश गायकवाड, सुकेशिनी सोनकांबळे आदी प्रशिक्षण शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करत आहेत.

**संबंधित गुत्तेदारावर योग्य ती कारवाई करावी जनतेची मागणी**

# वागदरी पाटी ते नळदुर्ग रोडची सहा महिन्यातच तीनदा दुरुस्ती करूनही दुरावस्थाच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के. गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते अक्कलकोट रोडवरील वागदरी पाटी ते नळदुर्ग नव्याने बनविलेल्या डांबरीकरण रस्त्याची सहा महिन्यात तीनदा दुरुस्ती करूनही ये रे माझ्या मागल्या म्हटल्याप्रमाणे जागोजागी खड्डे पडून अत्यंत दुरावस्था झालेली आहे.



याबाबत माहिती अशी की नळदुर्ग ते अक्कलकोट राष्ट्रीय महामार्गचे दोन पदरी सिमेंट रोडचे काम शेतकऱ्याने अडवल्यामुळे जागोजागी मोठमोठे खड्डे पडून अडवलेल्या ठिकाणी रोडची अत्यंत दुरावस्था झालेली होती. शासन प्रशासन आणि शेतकरी संघर्ष समिती यांनी समन्वयाने पूर्वी असलेल्या रोडचे किमान डांबरीकरण करून हा रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्याच्या उद्देशाने सात-आठ महिन्यापूर्वीच या रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले होते. परंतु सदर डांबरीकरणाचे काम संबंधित गुत्तेदारांनी अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे जागोजागी डांबरीकरण उकडून खड्डे कडून परत दुरावस्था झाली होती. परत जनतेतून रस्ता दुरुस्तीची मागणी करण्यात आली. जनतेची ओरड लक्षात घेऊन त्या रस्त्याची सहा महिन्यात तीनदा दुरुस्ती करण्यात आली परंतु तीनदा दुरुस्ती करूनही ये रे माझ्या मागल्या म्हटल्याप्रमाणे वागदरी पाटी ते नळदुर्ग या रस्त्यावर नव्याने केलेला डांबरीकरण रस्ता तीनदा दुरुस्त करूनही ऊस वाहतूक गाड्यांमुळे पुन्हा जागोजागी उघडून मोठे मोठे खड्डे पडले असून या रस्त्यावरून वाहतूक करणे म्हणजे वाहन चालकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे वेळोवेळी तुळजापूर विधानसभेचे विद्यमान आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्याकडे लेखी व तोंडी पाठपुरावा करूनही संबंधित गुत्तेदार या रोडच्या दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. तेंव्हा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने या संदर्भात लक्ष देऊन सखोल चौकशी करून संबंधित गुत्तेदारावर योग्य ती कारवाई करून या रस्त्याची पुन्हा चांगल्या दर्जाची दुरुस्ती करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

# रायगव्हाण ग्रामपंचायत कार्यालय च्या वतीने दिव्यांग बांधवांना पाच टक्के निधीचे वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील रायगव्हाण येथील येथील ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने दि.१८ डिसेंबर २०२५ रोजी दिव्यांग बांधवांना ५% निधीचे वाटप करण्यात आले.

या वेळी एकुण १६दिव्यांग लाभार्थी यांना प्रत्येकी ७०० रुपये देण्यात आले. कार्यक्रमासाठी गावच्या सरपंच माधवी विकास गिराम, उपसरपंच जयश्री बाबासाहेब एडके, ग्रामविकास अधिकारी अमोल अंधारे, ग्रामपंचायत सदस्य किसन भिसे, माजी उपसरपंच रत्नलिंग गिराम, सिद्धेश्वर गिराम, भाऊसाहेब एडके,मधुकर गिराम, बालासाहेब एडके, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मेंढेकर, जगन्नाथ भिसे, रावसाहेब गिराम, रविशंकर गिराम, विश्वंभर गिराम, चंद्रकांत गिराम, विनायक पंडित एडके, विकास गिराम, शाहूराज सुरवसे, हनुमंत नरसिंगे, विनायक यशवंत एडके, हनुमंत गोरोबा एडके, विठ्ठल एकनाथ एडके, विजयकुमार शंकर गिराम, श्रीमती शितल देविदास भिसे, शिवकन्या विष्णू सुरवसे,कांचन मलिकार्जुन कडके, सुशालाबाई रावसाहेब गिराम, सीताबाई बाळासाहेब भिसे, कुमारी प्रतिभा भागवत एडके, आराध्या गुरुनाथ गिराम यांच्यासह आणि गावातील सर्व प्रतिष्ठित मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्ती पूर्णतः सुरक्षित

## मूर्ती संवर्धनाबाबत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचा अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी सादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या पवित्र मूर्तींच्या सुरक्षितता व दीर्घकालीन संवर्धनाच्या दृष्टीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (डख), छत्रपती संभाजीनगर यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर लेखी अहवाल सादर केला आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाकडून प्राप्त झालेल्या या अहवालास श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीची मंजुरी घेऊन, पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सदर अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



सन २०२० मध्ये भारतीय पुरातत्त्व विभागामार्फत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींवर वज्रलेपाची संवर्धन प्रक्रिया करण्यात आलेली असून, सध्या दोन्ही मूर्ती पूर्णतः सुरक्षित स्थितीत आहेत. तथापि, भविष्यात मूर्तींची कोणतीही झीज अथवा नुकसान होऊ नये, या उद्देशाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने सुचविलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाच्या मंजुरीनंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहेत.

यासंदर्भात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने वारकरी, भाविकांना व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्ती पूर्णतः सुरक्षित आहेत. मूर्तींच्या संरक्षण व संवर्धनासाठी शासन, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि मंदिर समिती यांच्यात समन्वयाने कार्यवाही सुरू असून, भाविकांच्या श्रद्धेच्या दृष्टीने मूर्तींच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. तथापि, मूर्तीची झीज होऊ नये म्हणून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मंदिर समितीने दक्षता घेतली असल्याचे यावेळी श्री औसेकर यांनी सांगितले.


### सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी भाजपची तयारी सुरू

# आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भाजपकडून महापालिका निवडणुकीसाठी निवडणूक प्रमुखांची घोषणा करण्यात आली असून, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची सोलापूर महापालिका निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अधिकृतपणे जाहीर केली आहे. आगामी निवडणुकीत सोलापूर महानगरपालिकेत सत्ता मिळवण्याच्या दृष्टीने भाजपने आतापासूनच नियोजनबद्ध तयारीला सुरुवात केल्याचे या नियुक्तीतून स्पष्ट होते.




आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना संघटन बांधणीचा मोठा अनुभव असून, जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्यात त्यांनी यापूर्वीही प्रभावी भूमिका बजावली आहे. महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आढावा घेणे, इच्छुक उमेदवारांची चाचपणी, कार्यकर्त्यांचे संघटन, प्रचार यंत्रणेची आखणी आणि निवडणूक रणनीती तयार करण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी निवडणुकीत सोलापूर महानगरपालिकेत भाजप सत्ता स्थापनेसाठी आक्रमक रणनीती राबवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, सोलापूर महापालिका निवडणूक भाजप स्वबळावर लढवण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट संकेत पक्षाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या काळात सोलापूरच्या राजकारणात हालचालींना वेग येणार असून, इतर पक्षांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मालमत्ता, पाणीपट्टी करात ५० टक्के सवलत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत, चालू वर्षाच्या करासह थकबाकीची ५० टक्के रक्कम एकाच वेळी भरल्यास, निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५० टक्के सवलत मिळणार आहे.तरी कडबगांव ग्रामपंचायतीकडून सवलतीचे लाभ घ्यावे असे आवाहन कडगाव चे सरपंच शिवलिला महांतेश्वर पाटील यांनी केले आहे.

**कडबगांव ग्रामपंचायतीकडून सवलतीचे लाभ नागरिकांनी घ्यावे : सरपंच शिवलिला पाटील**

कडबगांव ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत नागरिकांना मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करामध्ये ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. ही सवलत फक्त अभियान कालावधीत म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत लागू असणार आहे.योजनेनुसार,ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर,पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कराच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत दिली जाईल. नागरिकांना चालू २०२५-२६ या वर्षाचा पूर्ण कर एकरकमी भरावा लागणार आहे.

१ एप्रिलपूर्वीची थकबाकी भरतांना ५० टक्के सवलत लागू होईल.मात्र, थकबाकीवरील सवलतीची उर्वरित रक्कमही एकरकमीच भरावी लागणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे. या योजनेला प्रतिसाद मिळत असून नागरिकांनी थकबाकी व चालू वर्षाचा कर भरून सवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. तर या निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५० टक्के सवलत मिळण्याचे आवाहन कडबगांव ग्रामपंचायतिच्या सरपंच शिवलिला महातेश्वर पाटील यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी ग्रामपंचायत अधिकारी दयानंद खोबण्णा यांच्याशी संपर्क साधावे असे उपसरपंच अनिल सोनकांबळे यांनी आवाहन केले.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या वतीने अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त जाणीव जागृती रॅली; राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : संविधानाचा मान- अल्पसंख्यांकांचा सन्मान, अल्पसंख्यांक हक्काचे रक्षण- लोकशाहीचे संरक्षण, अल्पसंख्यांक समाजाचा विकास-देशाचा विकास, संविधानाचे रक्षण- लोकशाहीचे रक्षण या घोषणांनी अक्कलकोट शहराचा परिसर दुमदुमून गेला, निमित्त होते कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने अल्पसंख्यांक दिनानिमित्त आयोजित केलेल्या जाणीव जागृती रॅलीचे



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने अल्पसंख्यांक दिनानिमित्त खास अक्कलकोट येथील नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी जाणीव जागृती रॅली आयोजित करण्यात आली होती.

महाविद्यालयापासून निघालेली अल्पसंख्यांक रॅली हन्नूर चौक, मल्लिकार्जुन मंदिर, एसटी स्टँड, कारंजा चौक,जुना राजवाडा, स्वामी समर्थ मंदिर परिसरात संपन्न झाली. रॅलीचे नियोजन कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे, प्रा सौरभ भस्मे यांनी केले. यावेळी प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा मधुबाला लोणारी, शिल्पा धूमशेट्टी, सोनाली कटकधोंड, जनाबाई चौधरी, हर्षदा गायकवाड,ओंकार घिवरे उपस्थित होते. उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जुनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी,सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

**अल्पसंख्यांकांना हक्क, सुविधा व सवलती मिळाल्या पाहिजेत**

**दरम्यान रॅलीच्या आधी ड प्रा सोनाली कटकधोंड यांनी आपल्या व्याख्यानातून अल्पसंख्यांकांना त्यांचे हक्क सुविधा व सवलती पासून अधिकारी मंडळींनी वंचित ठेवू नये असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणासाठी कर्जाची सुविधा, रोजगाराची संधी याबद्दल सविस्तर माहिती दिली.**

# निवडणुकीसाठी महापालिकेने एक खिडकी योजना सुरू करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : महापालिका निवडणुकीची धामधुम सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज लवकरच दाखल करून घेण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून एकूण सात एनओसी उमेदवारी अर्जासोबत मागवण्यात आले आहेत. यामध्ये घरी शौचालय आहे का नाही याचा दाखला, मालमत्ता कर भरला आहे का नाही याचा दाखला, भूमी मालमत्ता विभागाचा दाखला, नगर अभियंता कार्यालयाचा दाखला, झोन कार्यालयाचा दाखला, गुन्हा दाखल नसल्याचा दाखला रहिवासी दाखला, नगरसचिव यांचा दाखला अशा विविध प्रकारचे दाखले अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. पण यासाठी उमेदवारांना वेगवेगळ्या कार्यालयात फिरावे लागणार आहे. यामुळे संबंधित कार्यालय आणि इच्छुक उमेदवार यांची धावफळ होण्याची होणार आहे. यासाठी सोलापूर महानगरपालिकेने एक खिडकी योजना सुरू करावी, अशी आमची मागणी आहे. संबंधित दाखले याच एक खिडकी योजनेतून त्वरित देण्याची महानगरपालिकेने व्यवस्था करावी अशी आमची ठाम मागणी आहे. याबाबत आज मी सौ. संगीता जाधव स्वतः मनपा आयुक्तांना यांना निवेदन दिले.

### डॉ. बी. पी. रोंगे यांच्या प्रयत्नांना यश!

# रयत शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षकांच्या पदमान्यता व वेतनाचा प्रश्न मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील एकूण २७ मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. हा प्रश्न श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक तसेच स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या प्रभावी प्रयत्नांमुळे सुटला आहे.

मागील वर्षी रयत शिक्षण संस्थेतील २७ शिक्षकांची विविध पदांवर पदोन्नती झाली होती. मात्र, पदमान्यतेसंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया रखडल्याने काही शिक्षकांचे वेतन थांबले होते, तर काही शिक्षकांना पदोन्नतीच्या पूर्वी असलेल्या पदानुसार कमी वेतन दिले जात होते. परिणामी, शिक्षकांमध्ये अनिश्चितता आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर डॉ. रोंगे यांनी माध्यमिक शिक्षण विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी सचिनजी जगताप यांची



भेट घेऊन प्रकरणाची सविस्तर मांडणी केली.

तांत्रिक अडचणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय प्रक्रिया यांवर झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर अखेर या प्रलंबित प्रश्नाचा मार्ग सुकर झाला. निर्णयानंतर संबंधित शिक्षकांना पदमान्यता मिळाली असून त्यांचे रखडलेले वेतनही मंजूर झाले आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्याकडून याबाबत समाधान व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातून या निर्णयाचे स्वागत होत असून, शिक्षकांनी डॉ. रोंगे यांच्या प्रयत्नांचे मनापासून कौतुक केले आहे.

या प्रसंगी प्राचार्य के. के. जाधव (भैरवनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अंकोली), प्राचार्य मिसाळ (न्यू इंग्लिश स्कुल, रिधोरे), प्राचार्य केत (रावजी सखाराम हायस्कुल, सोलापूर), प्राचार्य के. डी. शिंदे (न्यू इंग्लिश स्कुल, भाळवणी), प्राचार्य रोकडे (न्यू इंग्लिश स्कुल, टेंभुर्णी), प्रा. बाळासाहेब शिंगाडे (विवेकवर्धिनी विद्यालय, पंढरपूर), पर्यवेक्षक एस. जी. जरे (यशवंत विद्यालय, भोसे) व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

शिक्षकांच्या अडचणींना प्राधान्य देत प्रशासनाशी सातत्याने संवाद साधणारे आणि प्रश्न सोडवण्यासाठी ठाम भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून डॉ. बी. पी. रोंगे यांची भूमिका महत्वाची ठरली आहे.

**डॉ. रोंगे सरांनी केलेल्या प्रयत्नांमुळे गेल्या मार्च महिन्यापासून प्रलंबित असणाऱ्या मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदाच्या मान्यतांचा प्रश्न सुटला आहे. ज्यामुळे २७ शिक्षकांना न्याय मिळाला आहे. याबद्दल डॉ. रोंगे सर व शिक्षणाधिकारी सचिन जगताप साहेब यांचे आम्ही आभारी आहोत.- प्रा. के. के. जाधव (प्राचार्य, भैरवनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अंकोली).**

# महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक अभिमानास्पद यश !



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे दि.१५ व १६ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या ३६ वी राष्ट्रीय जीत कुने डो स्पर्धेत असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर च्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन फाईट व काता या दोन्ही प्रकारात प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक पटकावला आहे सर्व विद्यार्थी हे महाराष्ट्राकडून प्रतिनिधित्व करत महाराष्ट्र राज्य ला प्रथम क्रमांक ट्रॉफी जिंकली आहे

सदर स्पर्धेसाठी १८ राज्यातून विद्यार्थ्यांचा सहभाग होता स्पर्धेचे उद्घाटन असोसिएशन ऑफ ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशन चे जनरल सेक्रेटरी ग्रँडमास्टर शंकरलाल गिहारा व दिल्लीतील प्रमुख मान्यवराच्या उपस्थित झाला याप्रसंगी सोलापूर चे ग्रॅन्ड मास्टर तथा ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशन चे राष्ट्रीय उपाध्यक्ष युवराज गायकवाड सर, मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री सुभाष काका चव्हाण,किर्तीपाल गायकवाड,टेक्निकल डायरेक्टर मास्टर किशोर चंदनशिवे भास्कर देडे आनंद जाधव प्रल्हाद जाधव सोलापूर जिल्हाप्रमुख अभिजीत गायकवाड सम्राट गायकवाड, नागेश कांबळे, संदिप गायकवाड,लेडिज कोच वैभवी दळवी, किमया सपाटे,सुमित पाटील, आदी मान्यवर विद्यार्थी, पालक, प्रशिक्षक, मार्गदर्शक, उपस्थित होते.

या ऐतिहासिक यशात सोलापूर टीमच्या आपल्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट व देखणी कामगिरी करत महाराष्ट्र नांव उंचावल आहे. ही कामगिरी संपूर्ण महाराष्ट्रासाठी, सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

सर्व विजयी विद्यार्थ्यांचे, प्रशिक्षकांचे व मार्गदर्शकांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!